# सुस्वागतम

# महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982

# व

# महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतनाचे नियम (अशासकीय) 1984

1. **दि.** 1/11/2005 **पुर्वीच्या कर्मचा-यांनाच वरील नियमांतर्गत निवृत्ती वेतन विषयाचा लाभ अनुज्ञेय.**

2. निवृत्ती वेतन म्हणजे शासकीय कर्मचा-याने केलेल्या चांगल्या वागणुकीबद्दल व चांगल्या कामगिरी बद्दल त्याला सेवा निवृत्तीनंतर देण्यात येणारी एक रकमी / मासिक रक्कम.

3. पुर्व शर्ती

अ) कर्मचारी कायम / स्थायीत्वाचा दाखला प्राप्त झालेला असावा.

ब) सेवा निवृत्तीच्या दिवशी त्या कर्मचा-याची विभागीय चौकशी वा पोलीस चौकशी प्रलंबित नसावी.

क) कर्मचा-यास ना चौकशी प्रमाणपत्र मिळणे गरजेचे.

# नियम 26 / 27 च्या तरतुदी

- सेवा निवृत्तीच्या दिवसापर्यंत दोषारोप पत्र निर्गमित झाले असल्यास अथवा त्यास या पुर्वी निलंबित केले असल्यास चौकशी लागू आहे.
- सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत जर त्याचे विरुद्ध FIR दाखला झाला असेल तर फौजदारी कार्यवाही चालू आहे.
- अशा परिस्थिती वरील दोन्ही प्रकरणांचा निकाल लागून निर्दोष मुक्तता झाल्या शिवाय निवृत्ती वेतन अनुज्ञेय नाही.

- परंतु दोषी ठरेपर्यंत तात्पुरते निवृत्तीवेतन देण्यात यावे तात्पुरते सेवा निवृत्ती उपदान देऊ नये.
- अशी प्रकरणे त्या तारखेस प्रलंबित नसेल तर निवृत्ती वेतन मंजूर होणे क्रमप्राप्त.
- निवृत्तीच्या दिनांकानंतरही चार वर्षापर्यंत विभागीय चौकशी सुरु करता येते.
- निवृत्ती वेतन धारकाने आपले वर्तणुक निवृत्ती नंतरही चांगलीच ठेवावी.

- न्यायालयात दोषी धरल्यास निवृत्ती वेतन काढून घ्यावे लागते. तसेच वर्तणुकीबद्दल तक्रार आल्यास त्याची चौकशी होऊ शकते व त्यानंतर निवृत्ती वेतनावर परीणाम करणारी शिक्षा देता येते.

# निवृत्ती वेतनाचे प्रकार

# नियम वयोमान निवृत्तीवेतन

- निर्धारित वय 58 ते 60 नंतर मिळेल.
- मुदतपुर्व निवृत्तीवेतन –
- अराजपत्रितच्या बाबत वय 55 व राजपत्रितच्या बाबत वय 50 पुर्ण झाल्यावर कर्मचारी निवृत्त होऊ शकतो / शासनहीं त्यास निवृत्त करु शकतो.
- आर्हताकारी सेवेची 30 वर्ष पुर्ण झाल्यावर कर्मचारी निवृत्त होऊ शकतो / शासनही त्यास निवृत्त करु शकतो. (वय बघण्याची गरज नाही)
- वरील दोन्ही प्रकारात कर्मचारी तत्पुर्वी निलंबित नसेल तर शासनास परवानगी नाकारण्याचा अधिकार नाही.

# स्वेच्छानिवृत्ती वेतन

- आहर्ताकारी सेवेची 20 वर्ष झाल्यावर कर्मचारी निवृत्त होऊ शकतो, पण नियुक्ती अधिका-याची परवानगी आवश्यक.

# रुग्णात निवृत्ती वेतन

- प्रकृती अस्वास्थेच्या कारणास्तव शल्य चिकित्सकांनी कायम स्वरुपी अपात्र आहे असे प्रमाणित केल्यास निवृत्त करता येते. आजार वाईट सवयीचा परिणाम झाला असल्यास निवृत्ती वेतन अनुज्ञेय नाही. तसेच आजार वाईट सवयीचा अप्रत्यक्ष संबंध असल्यास निवृत्ती वेतनात कपात करता येते.

# सक्तीचे निवृत्ती वेतन

- हा शिक्षेचा प्रकार या प्रकारात शिक्षा देणारा अधिकारी निवृत्ती वेतनात 1/3 पर्यंत कपात करु शकतो.

- 2/3 पेक्षा कमी देता येणार नाही.

- किमान निवृत्ती वेतनापेक्षा निवृत्ती वेतन कमी करता येणार नाही.

# अनुकंपा निवृत्ती वेतन

- बडतर्फी व कामावरुन काढून टाकल्यास निवृत्ती वेतन अनुज्ञेय नाही.
- कामावरुन काढून टाकलेले अनुकंपा निवृत्ती वेतनासाठी अर्ज करु शकतात.
- नियुक्ती प्राधिकारी विनंती मान्य करु शकतो / फेटाळू शकतो.
- 2/3 पेक्षा जास्त निवृत्ती वेतन मंजूर करता येणार नाही.

# कुटुंब निवृत्ती वेतन

- सेवेत कायम असण्याची आवश्यकता नाही.
- सेवेत असताना मृत्यू झाला तरी व सेवेनंतरही मृत्यू झाला तरी अनुज्ञेय.
- 7 वर्षापेक्षा कमी सेवा सर्वसाधारण दराने अंतिम वेतनाच्या 30%
- 7 वर्षापेक्षा सेवा जास्त –

  अ) प्रथम 10 वर्षे वाढीव दराने अंतिम वेतनाच्या 50 %
  
  ब) तदनंतर सर्वसाधारण दर अंतिम वेतनाच्या 30%

- सेवानिवृत्ती नंतर मृत्यू –

  त्याच्या वयाच्या 65 वर्ष होईर्यंत वाढीव दर व त्या नंतर सर्वसाधारण दर

# पात्रता

अ) विधवा – हयात असे पर्यंत पुर्नविवाह झाला तरी.

ब) विधुर हयात असे पर्यंत अथवा पुर्नविवाह तारिखा यातील आधी घडेल तो पर्यंत

क) मुलगे वय 21 पुर्ण होईपर्यंत अथवा अर्थाजन सुरु करीपर्यंत

ड) मुलगी वय वर्ष 24 पुर्ण होईपर्यंत अथवा विवाह होई पर्यंत अथवा अर्थाजन सुरु करीपर्यंत यातील जे आधी घडेल तोपर्यंत.

इ) मानसिक विकलांग अपत्यास हयात भर (शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र व उपजीविका करण्यास असमर्थ असल्याची खात्री होण्याचे अधीन राहून.

ई) एकुलता एक अविवाहित कर्मचा-याचे आई-वडील जर त्याचे वर पुर्णपणे अवलंबून असल्यास त्यांना अनुज्ञेय.

- घटस्पोट झाल्यावर अनुज्ञेय नाही.
- न्यायीक फारकतीचे काळात अनुज्ञेय.
- वैवाहीक जोडदार अपात्र असला तरी अपत्यांना कुटुंब निवृत्ती वेतन देता येते.
- व्दिभार्या प्रतीबंधक कायदा लागू नसलेल्या कर्मचा-याच्या विधवा पत्नींना सम प्रमाणीत वाटप.
- अन्य्ा प्रकरणात फक्त कायदेशीर पत्नीस कुटुंब निवृत्ती वेतन अनुज्ञेय (3/11/2008 चा वित्त विभाग शार्सन निर्णय)

# अर्हतकारी सेवा

- कर्मचा-याची जन्म तारिख + निवृत्तीचे वय प्रमाणे तारिख काढावी व त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस निवृत्त करावे.

- त्यामधून प्रथम नियुक्ती दिनांक वजा करावी. (अखंड सेवा ग्राह)

- येणा-या वजाबाकीतून पुर्व वर्ष X 2 एकूण सहामाही कालावधी काढावा. व तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ असेल तर एक सहामाही वाढवावी.

# उदाहरण

| | |
|---|---|
| जन्म तारिख | 27 - 12 - 1951 |
| निवृत्तीचे वय | + 58 |
| | 27 - 12 – 2009 |
| निवृत्तीची तारिख | 31 - 12 - 2009 |
| अखंड सेवा सुरु | 18 - 04 – 1982 |
| एकूण अहर्ताकारी सेवा | 13 - 08 - 027 |
| सहामाही सेवा | 27 X 2 = 54 + 1 |
| | 55 सहामाही |

(2 महिने 13 दिवसांची गणना सोडून दयावी)

# निवृत्ती वेतनाची गणना

- निवृत्तीच्या दिनांकास दहा वर्षापेक्षा जास्त अर्हताकारी सेवा असल्यास अंतिम वेतन / सरासरी वेतन यापैकी जे जास्त असेल त्याच्या 50 % रक्कम निवृत्ती वेतन.

- दहा वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास मासिक निवृत्ती वेतन अनुज्ञेयच नाही.

- त्या ऐवजी प्रत्येक सहामाही कालावधीस ½ वेतन या प्रमाणे एक रक्कमी सेवा उपदान दयावे.

# सेवा उपदान

- अहर्तांकारी सेवेचा प्रत्येक सहामाही अंतिम वेतनाच्या 1/4 वेतन या प्रमाणे गणना करुन उपदान ठरते. जास्तीत जास्त 16 ½ महिन्याचे वेतन किंवा 7 लाख आर्थिक मर्यादेत देता येते.

**सुत्र** = $\frac{\text{वेतन}}{4}$ X अहर्तांकारी सेवेच्या सहामाही = सेवाउपदान

- टिप : वेतन म्हणजे वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतनच धरण्यात येते.

# मृत्यू उपदान

- सेवेत असताना मृत्यू झाल्यास कर्मचा-याच्या कुटुंबियांना खालील प्रमाणे मृत्यू उपदान मिळते.

| आर्हतीक सेवा | अनुज्ञेय (अंतिम वेतनाच्या) |
|---|---|
| 1 वर्षा कमी | 2 पट |
| 1 ते 5 वर्षापर्यंत सेवा | 6 पट |
| 5 ते 20 वर्षापर्यंत सेवा | 12 पट |
| 20 वर्षापेक्षा जास्त सेवा | आहर्ताकारी सेवेच्या पुर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी वेतनाच्या 50 % किंवा जास्तीत जास्त 33 महिन्याचे वेतन अथवा आर्थिक मर्यादा 7 लाख पर्यंत |

# अंशराशीकरण

- वैकल्पिक
- निवृत्ती वेतनाच्या 40% रकमेपर्यंत.
- निवृत्ती पुर्व 3 महिने किंवा निवृत्तीनंतर एक वर्षापर्यंत अर्ज केल्यावर वैदयकीय तपासणी शिवाय अनुज्ञेय

<u>**सुत्र :**</u>

अंतिम निवृत्ती वेतन X 40% = अंशराशीकृत रक्कम

अंशराशीकृत रक्कम X 12 X 8.371

# शासन निर्णय 30/10/2009 च्या परिशिष्ट मधील पुढील वाढदिवसाचे वयाचे रकान्यापुढील रक्कम

| | |
|---|---|
| निवृत्ती वेतन | 10000 X 40% = 4000 |
| अंशराशीकृत रक्कम | 4000 X 12 X 8.371 |
| अंशराशीकृत मुल्य | 401808 |

# नामनिर्देशन

नामनिर्देशन न सादर करता मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसाचे प्रमाण पत्रांत नमूद केलेल्या वारसांपैकी

- जर विधवा पत्नी / मुलगे / अविवाहित मुलगी असल्यास सम प्रमाणात वाटप करावे.
- पुढील वारस म्हणजेच आई / वडील / अज्ञान भाऊ – बहिण / विवाहित मुली यांचा विचार करण्याचे गरज नाही.
- जर विधवा पत्नी / मुलगे / अविवाहित मुली नसतील तर इतरांना समान वाटप करावे.

- विवाहित कर्मचा-याने त्याचे नामनिर्देशन त्याची पत्नी / मुलगे / अविवाहित मुले यांचेच नावे करावे.

- अविवाहित कर्मचारी त्यांचे कुटुंबातील व अन्य व्यक्तींचे नावे नामनिर्देशन करु शकेल.

- नामनिर्देशन स्वीकारताना पोहच कार्यालय प्रमुखाने दयावी व सेवा पूस्तकामध्ये नोंद करावी.

# कुटुंबाचा तपशील

- ज्या सदस्यांना कुटुंब निवृत्ती वेतन मिळू शकते अशा सदस्यांची नावे दर्शविणारा कुटुंबाचा तपशील विहित नमुन्यात सादर करावा.

# प्रकरण सादर करावयाच्या पद्धती

## शासन निर्णय : 2/7/2015

- दोन वर्ष आधी सेवा पुस्तक तपासून उणिवा शोधा व पुर्तता करा.
- सहा महिने आधी कर्मचा-याकडून वैयक्तिक तपशील उदा. निवृत्तीनंतरचा पत्ता, कोषागाराची निवड, आधार लिंक, बँक खात्याचा उतारा / अंगावरच्या ओळखण्याच्या खुणा / नमुना सही / एकत्रित नवरा बायकोचा फोटो / प्राप्त करावा.
- तीन महिने आधी सेवार्थ प्रणालीत गणना पत्रक तयार करुन महालेखापाल यांना प्रणाली व्दारे पाठवावे. व त्याची एक प्रत / सेवा पुस्तक / नमुना सहपत्र / अंगावरच्या ओळखण्याच्या खुणा / एकत्रित नवरा बायकोचा फोन पोस्टाने पाठवावा.
- पी. पी. ओ. आल्यावर तात्पुरत्या निवृत्ती वेतन व उपदान प्रदानाच्या प्रमाणपत्रासह Online ओळख पटवून कोषागाराकडून पाठवून दयावे.

# तात्पुरते निवृतीवेतन

1. ज्या कर्मचा-यावर विभागीय चौकशी / न्यायीक चौकशी चालू असेल त्यांना उदरनिर्वाहासाठी तात्पुरते निवृत्ती वेतन देण्यात यावे परंतू तात्पुरते सेवा उपदान देता येणार नाही.

2. प्रथम सहा महिन्यासाठी कार्यालय प्रमुख मंजूर करून करु शकतात. पुढील कालावधीसाठी महालेखापाल यांचे अनुमतीने देता येईल.

3. ज्या कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन कागदपत्रा अभावी (सेवा पुस्तक वगैरे) देता येत नाही पण त्यांचे बाबतीत ना चौकशी प्रमाणपत्र आले असल्यास तात्पुरते निवृत्ती वेतन व तात्पुरते उपदान सुद्धा प्रदान करता येईल.

# निवृत्तीवेतनावर व्याज

कर्मचा-यास सहा महिन्यात निवृत्ती वेतन व तीन महिन्यात उपदान न मिळण्यास त्यास व्याज देता येते पण व्याजाची वसुली जे कर्मचारी अधिकारी विलंबास जबाबदार असतील त्याचे कडून वसुल करण्यात येते. या पार्श्वभुमीवर सर्वांनाच तात्पुरते निवृत्त वेतन देणे इष्ठ राहिल.


धन्यवाद